**RELIANCE INDUSTRIES LIMITED** is proposing, subject to market conditions and other considerations, a rights issue of its Rights Equity Shares and has in this regard filed a Letter of Offer dated May 15, 2020 with SEBI and the Stock Exchanges. The Letter of Offer is available on the website of SEBI at www.sebi.gov.in, the Stock Exchanges, i.e., BSE Limited at www.bseindia.com, National Stock Exchange of India Limited at www.nseindia.com, Registrar's web-based application platform at https://rights.kfintech.com and on the websites of the Global Co-ordinators and Lead Managers, JM Financial Limited and Kotak Mahindra Capital Company Limited at www.jmfl.com and http://www.investmentbank.kotak.com, respectively, and on the websites of the Lead Managers, Axis Capital Limited, BNP Paribas, Citigroup Global Markets India Private Limited, DSP Merrill Lynch Limited, Goldman Sachs (India) Securities Private Limited, HDFC Bank Limited, HSBC Securities and Capital Markets (India) Private Limited, ICICI Securities Limited, IDFC Securities Limited, J.P. Morgan India Private Limited, Morgan Stanley India Company Private Limited and SBI Capital Markets Limited at http://www.axiscapital.co.in, http://www.bnpparibas.co.in, http://www.mlindia.com, http://www.online.citibank.co.in/rhtm/citigroupglobalscreen1.htm, www.goldmansachs.com, www.hdfcbank.com, https://www.business.hsbc.co.in/en-gb/in/generic/ipo-open-offer-and-buyback, http://www.icicisecurities.com, http://www.idfc.com/capital/index.htm, http://www.jpmipl.com, http://www.morganstanley.com/about-us/global-offices/asia-pacific/india and http://www.sbicaps.com, respectively. Investors should note that investment in equity shares involves a degree of risk and are requested to refer to the section titled "Risk Factors" on page 23 of the Letter of Offer for details of the same.

THE RIGHTS ENTITLEMENTS AND THE RIGHTS EQUITY SHARES HAVE NOT BEEN AND WILL NOT BE REGISTERED UNDER THE US SECURITIES ACT, OR ANY U.S. STATE SECURITIES LAWS AND MAY NOT BE OFFERED, SOLD, RESOLD OR OTHERWISE TRANSFERRED WITHIN THE UNITED STATES, EXCEPT IN A TRANSACTION EXEMPT FROM THE REGISTRATION REQUIREMENTS OF THE US SECURITIES ACT. THE RIGHTS EQUITY SHARES REFERRED TO IN THIS ADDENDUM AND THE LETTER OF OFFER ARE BEING OFFERED AND SOLD (I) IN OFFSHORE TRANSACTIONS OUTSIDE THE UNITED STATES IN COMPLIANCE WITH REGULATION S UNDER THE US SECURITIES ACT TO EXISTING SHAREHOLDERS LOCATED IN JURISDICTIONS WHERE SUCH OFFER AND SALE OF THE RIGHTS EQUITY SHARES IS PERMITTED UNDER LAWS OF SUCH JURISDICTIONS AND (II) IN THE UNITED STATES TO U.S. QIBs PURSUANT TO SECTION 4(A)(2) OF THE US SECURITIES ACT AND OTHER EXEMPTIONS FROM THE REGISTRATION REQUIREMENTS OF THE US SECURITIES ACT. THE OFFERING TO WHICH THIS ADDENDUM AND THE LETTER OF OFFER RELATE IS NOT, AND UNDER NO CIRCUMSTANCES IS TO BE CONSTRUED AS, AN OFFERING OF ANY RIGHTS EQUITY SHARES OR RIGHTS ENTITLEMENTS FOR SALE IN THE UNITED STATES OR AS A SOLICITATION THEREIN OF AN OFFER TO BUY ANY OF THE SAID SECURITIES, EXCEPT IN EACH CASE TO PERSONS IN THE UNITED STATES WHO ARE U.S. QIBs. ACCORDINGLY, YOU SHOULD NOT FORWARD OR TRANSMIT THIS ADDENDUM OR LETTER OF OFFER IN OR INTO THE UNITED STATES AT ANY TIME (OTHER THAN TO U.S. QIBs).

All offers and sales in the United States of the Rights Entitlements and the Rights Equity Shares have been, or will be, made solely by our Company. The Global Co-ordinators and Lead Managers and the Lead Managers are not making, and will not make, and will not participate or otherwise be involved in any offers or sales of the Rights Entitlements, the Rights Equity Shares or any other security with respect to this Issue in the United States.

# रुग्ण वाचवा, मुंबईकर वाचवा!

## मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या कार्यालयाबाहेर भाजपचे मूक आंदोलन

**मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी)**: मुंबईतील वाढती कोरोनाबाधितांची संख्या, उपचारासाठी प्रतीक्षा करणारे रुग्ण आणि उपचार न मिळाल्याने मृत्यू पावणारे रुग्ण, अशा एकूणच ढासळत्या आरोग्य सेवेबाबत मुंबई महापालिकेतील भाजप नगरसेवकांनी शुक्रवारी आयुक्त यांच्या कार्यालयाबाहेर मूक निदर्शने करत 'रुग्ण वाचवा, मुंबईकर वाचवा' अशी हाक दिली.

दरम्यान आयुक्तांना खासगी रुग्णालयातील बेड्स ताब्यात घेण्याचे आणि याला विलंब लावणाऱ्यांची चौकशी करण्याचे आश्वासन दिल्याचे शिंदे यांनी सांगितले.

मुंबई महापालिकेतील भाजप गटनेते प्रभाकर शिंदे, पक्षनेता विनोद मिश्रा व प्रवक्ता भालचंद्र शिरसाट तसेच अन्य वरिष्ठ नगरसेवक यांनी मुंबईच्या महापौर, आयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांच्या दालनाबाहेर तोंडावर काळी पट्टी/मास्क बांधून एक तास मूक धरणे आंदोलन केले.

कोरोनामुळे त्रस्त मुंबईकर रुग्ण बेडसाठी वणवण भटकत आहेत. बेड, आयसीयु, व्हेंटिलेटर मिळाला नाही म्हणून आजपर्यंत शेकडो गंभीर रुग्णांची प्राणज्योत मालवली आहे.

महाराष्ट्र शासनाकडून आदेश (२१ मे २०२०) येऊन १४ दिवस झाल्यानंतरही आजपर्यंत खासगी रुग्णालयातील बेड्स ताब्यात घेण्यात आले नाहीत. परिणामी साध्या बेड्स, अतिदक्षता-व्हेंटिलेटर बेड्स मुंबईकरांना उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे.




अनेकांना उपचार मिळत नाही. उपचार न मिळाल्याने अनेकांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासठी मूक धरणे आंदोलन केल्याचे शिंदे यांनी सांगितले.

भाजपने सातत्यपूर्ण पत्रव्यवहार केला. प्रत्यक्ष भेटीत चर्चा केल्यानंतरही मुंबई महापालिकेतील सत्ताधारी, शासन, प्रशासनाने अद्याप खासगी रुग्णालयातील वैद्यकीय बेड्स ताब्यात घेतलेले नाहीत. त्यामुळे कित्येक कोरोनाग्रस्त मुंबईकरांची हालअपेष्टा सुरू आहे. त्यांची प्राणज्योत मालवल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार आहे का, असा प्रश्नही शिंदे यांनी केला.

या धरणे आंदोलनात नगरसेवक अतुल शाह, नगरसेविका उज्ज्वला मोडक, रिटा मकवाना, दक्षा पटेल, ज्योती अळवणी, राजश्री शिरवाडकर, नेहल शाह, नगरसेवक कमलेश यादव, अभिजित सामंत, सुनील यादव, ॲड. मकरंद नार्वेकर, सुषम सावंत, अनीस मकवानी सहभागी झाले होते.

### प्रमुख मागण्या

मुंबईतील खासगी रुग्णालयातील ८० टक्के म्हणजेच १६,००० बेड्सबाबत महापालिकेने श्वेतपत्रिका काढावी. हे बेड्स २४ तासांत ताब्यात घ्यावेत आणी महापालिका व खासगी रुग्णालयातील सर्व उपलब्ध बेड्सची माहिती महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या डॅशबोर्डवर आणावी, तसेच हा डॅशबोर्ड मोबाईल ॲपवर सामान्य मुंबईकरांना उपलब्ध करून द्यावा. खासगी रुग्णालयात 'कोविड' रुग्णांच्या उपचाराचे दरपत्रक प्रसिद्ध करावे, या भाजपच्या प्रमुख मागण्या होत्या. तसेच कोरोनाग्रस्त रुग्णांप्रति महापालिकेची संवेदनहीनता समोर आणावी आणि सत्ताधाऱ्यांना जागे करावे, यासाठीही भाजप नगरसेवक गटाने मूक धरणे आंदोलन केले.



**मुंबई** : राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी शुक्रवारी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राजभवन येथे चाफ्याचे रोप लावले. प्रत्येक व्यक्तीने पर्यावरण संवर्धनासाठी किमान एक रोप लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.

# 'बेस्ट'च्या ३५० कर्मचाऱ्यांना 'कोरोना'ची बाधा

## आतापर्यंत २०० कामगारांची आजारावर यशस्वी मात; ८ जणांचा मृत्यू

**मुंबई,दि.५(प्रतिनिधी)**: अत्यावश्यक सेवेत बांधील असतानाच 'बेस्ट'च्या ३५० कर्मचाऱ्यांना आतापर्यंत कोरोनाची लागण झाली. मात्र, त्यापैकी २०० कर्मचाऱ्यांनी कोरोनावर यशस्वी मात केल्याने त्यांना घरी सोडण्यात आले. दुर्दैवाने आठ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला.

सद्यस्थितीत १४२ कर्मचाऱ्यांवर विविध रुग्णालयात उपचार सुरु असून त्यातील पाच जणांना अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले असल्याची माहिती 'बेस्ट' उपक्रमाच्या जनसंपर्क विभागातील एका अधिकाऱ्याने दिली.

सार्वजनिक वाहतूक सेवा बंद असल्याने अत्यावश्यक सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यालयात पोहोचण्यासाठी 'बेस्ट' बस हेच एकमेव साधन आहे. मात्र अत्यावश्यक सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोरोनाची लागण होताच त्याचा संसर्ग 'बेस्ट' कर्मचाऱ्यांनाही झाला. त्यामुळे आतापर्यंत 'बेस्ट'मधील ३५० कर्मचाऱ्यांना कोरोनाची लागण झाली. यातील २०० जणांनी कोरोनावर मात केली असली तरी अद्यापही १४२ कर्मचारी विविध रुग्णालयात उपचार घेत आहेत. यातील पाच जणांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना खासगी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले असून त्यांचा सगळा खर्च 'बेस्ट' उपक्रम करणार असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

### आरोपपत्र बेकायदा

'बेस्ट' उपक्रमातील वाहतूक विभागातील बसचालक, बसवाहक यांना सलग १५ दिवसांपेक्षा जास्त दिवस गैरहजर राहिल्याबद्दल 'बेस्ट' प्रशासनाने आरोपपत्र दिले आहे. त्यामुळे प्रशासनाविरोधात कामगारांमध्ये असंतोष पसरला आहे. मात्र सदर आरोपपत्र बेकायदा असल्याचे मत 'बेस्ट' जागृत कामगार संघटनेचे सरचिटणीस सुहास नलावडे यांनी 'बेस्ट'चे महाव्यवस्थापक डॉ. सुरेंद्रकुमार बागडे यांना पाठवलेल्या पत्रात व्यक्त केले आहे. कामगारांना दिलेले आरोपपत्र बेकायदा असल्याने त्वरित मागे घेण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# 'कोरोना'च्या मुकाबल्यासाठी भिवंडीत मनुष्यबळाची कमतरता

## विधान परिषद विरोधी पक्ष नेते प्रवीण दरेकर यांची माहिती

**भिवंडी, दि. ५ (प्रतिनिधी)** : ''राज्यात कोरोनाच्या वाढत्या प्रमाणाबरोबर आरोग्य यंत्रणांची कमतरता हीदेखील गंभीर समस्या आहे. रुग्णालयांमध्ये डॉक्टर्स, परिचारिका, आरोग्य कर्मचारी उपलब्ध नाहीत. यासाठी नवीन यंत्रणा उभ्या करण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत, मात्र जाहिराती देऊनही त्याला प्रतिसाद नाही. यासाठी विशेष प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा व कोणत्याही परिस्थितीमध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी मनुष्यबळ कमी पडू नये,'' अशी स्पष्ट भूमिका विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते प्रवीण दरेकर यांनी मांडली.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर भिवंडीमध्ये कशा पध्दतीने नियोजन केले गेले आहे व भविष्यामध्ये कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत यासंबधीत तपशीलवार चर्चा करण्यासाठी विधान प्रवीण दरेकर यांनी शुक्रवारी भिवंडीचा दौरा केला. भिवंडी-निजामपूर शहरातील महानगरपालिका कार्यालय येथे महापौर, पालिका आयुक्त आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत चर्चा केल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. याप्रसंगी महापौर प्रतिभा पाटील, खा. कपिल पाटील, आ. महेश चौघुले, आ. निरंजन डावखरे, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष संतोष शेट्टी, आयुक्त प्रवीण अष्टीकर, उप जिल्हाधिकारी वैदही रानडे, पोलीस अधिकारी शिंदे, वैद्यकीय अधिकारी यांसह भारतीय जनता पक्षाचे



अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

दरेकर यांनी सांगितले की,''भिवंडी महापालिकेत डॉक्टरांची कमतरता असल्याचे समजले. मुंबईमधल्या डॉक्टरांना जे मानधन आहे ते येथे मिळत नसल्याने डॉक्टर उपलब्ध होत नाहीत. चार फिजिशियन आवश्यक असलेल्या ठिकाणी एकच उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे चार अनेस्थेटिक डॉक्टरांच्या जागी एक डॉक्टर काम करत आहे. अशाप्रकारे जेथे ४६ कर्मचाऱ्यांची गरज आहे तेथे फक्त २० कर्मचारी उपलब्ध आहेत. मनुष्यबळ अपुरे असतानाही बेडची संख्या वाढविली जात आहे. जर डॉक्टर, परिचारिका, तसेच ऑक्सिजन, व्हेंटिलेटर आदी सुविधा नसतील, तर बेडसंख्या वाढवून काय उपयोग,'' असा सवाल दरेकर यांनी उपस्थित केला.

दरेकर पुढे म्हणाले,''काही कोटीच्या निधीमुळे महापालिकेला अथवा राज्य सरकारला फरक पडत नाही. हा निधी उपलब्ध करण्याच्या सूचना आयुक्त आणि जिल्हाधिकारी कार्यालयांना दिल्या आहेत. केवळ कमतरता समजून न घेता त्यासंबंधीत कोणत्या आवश्यक उपाययोजना करायच्या आहेत यासाठी आम्ही शासनाशी बोलू. शासनाला भिवंडीच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करायला भाग पाडू.कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाने आखून दिलेल्या नियमांचे उल्लंघन समाजात होताना दिसत असून लोक मास्कचा वापर करत नाहीत. त्यासाठी प्रबोधन व्हावे. कायद्याची अंमलबजावणी झाली नाही तर कोरोनाच्या प्रादुर्भावास प्रोत्साहन दिल्यासारखे होईल. एकंदर भिवंडी शहर आणि ग्रामीण याकरिता या दौऱ्याच्या माध्यमातून सरकारकडून राहून गेलेल्या कामांना गती मिळेल व मनुष्यबळ उपलब्ध होईल. यासाठी शासनस्तरावर शासनाला बोलून थांबणार नाही तर पाठपुरावा करण्याची जबाबदारी कर्तव्याच्या भावनेतून स्वीकारली आहे. यंत्रणेत झालेला फरक येणाऱ्या काळात नक्कीच दिसेल,'' असा विश्वास दरेकर यांनी व्यक्त केला.

कोरोनाच्या संकटात शासनाला सहकार्य करण्याची तयारी आहे. परंतु, त्रुटी, उणिवा व दोष हे जर दूर झाले नाही आणि कोरोना जास्त पसरला तर आम्हाला जाब हा विचारावाच लागेल. हा जनतेच्या जीविताचा प्रश्न आहे. येणाऱ्या काळात राज्यात रुग्ण वाढता नये. याची शासनाने दक्षता घ्यावी, अशा प्रकारचा प्रामाणिक उद्देश विरोधी पक्ष या भूमिकेतून आमचा आहे. त्यामुळे भिवंडीमध्ये हा सकारात्क बदल घडून कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झालेला दिसेल. अशी आशाही दरेकर यांनी व्यक्त केली.

# हिंदुस्थान पेट्रोलियम संलग्न संस्थेचे गोरगरिबांना मोफत अन्नधान्य वाटप



**मुंबई** : 'एचपी' सेवा संस्था आणि 'ऑल इंडिया हिंदुस्थान पेट्रोलियम एससी/ एसटी एम्प्लॉईझ वेल्फेअर असोशिएशन, मुंबई' यांनी 'सोशल ॲक्टिव्हिटीज इंटिग्रेशन' अर्थात 'साई' यांच्या माध्यमातून कामाठिपुरा विभागातील शेकडो गोरगरीब आणि गरजू महिलांना मोफत अन्नधान्याचे वाटप केले. ही संस्था देहविक्रय करणाऱ्या महिलांच्या पुनर्वसन आणि उत्कर्षासाठी गेल्या तीस वर्षांपासून कार्यरत आहे. टाळेबंदीच्या काळात त्यांच्या उत्पनाचे स्रोत बंद झाले आहे. रेशनकार्ड नसल्याने शासकीय अन्नधान्य मिळत नव्हते. परिणामी उपासमारीला सामोरे जावे लागत असे. या महिलांची ही व्यथा पाहून 'साई' संस्थेने मदतीचा हात पुढे केला. यावेळी एचपीसेवेचे अध्यक्ष वैभव गवळी, जनरल सेक्रेटरी शरद ननावरे, कार्यकारी अध्यक्ष तानाजी अदाते, सिध्दार्थ घोलप आदींनी मोलाचे सहकार्य केले.

# 'केशवसृष्टी', 'माय ग्रीन सोसायटी'चा गोवंडीतील गरजू नागरिकांना मदतीचा हात



**मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी)**: गोवंडी येथे घडलेल्या अग्नितांडवात जवळपास २५ घरे जळून खाक झाली. या दुर्घटनेत अनेकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. आगीच्या दुर्घटनेतून सावरत नाही तोच नुकत्याच आलेल्या मुसळधार पावसाने झोडपून काढल्याने येथील अनेक कुटंबावर बेघर होण्याची वेळ आली आहे. अशा कठीण परिस्थितीत 'संकल्प' संस्थेचे अध्यक्ष विनोद हिवाळे यांनी 'माय ग्रीन सोसायटी'चे सुशील जाजू यांना ही घटना सांगितली आणि वस्तीतील लोकांसाठी मदत मागितली. सुशील जाजू यांनी 'केशवसृष्टी','माय ग्रीन सोसायटी'च्या माध्यमातून वस्तीतील नागरिकांना रेशन किट आणि ताडपत्री वाटप केले. यावेळी कांता रोकडे, मोहम्मद अली शेख, सलीम खान, सोहेल खान, अरुण कुमार मौर्य, शबनम अन्सारी, अंजुम अन्सारी, नसरीन शेख, राहुल कटारे, मनीष हिवाळे उपस्थित होते.



# गैरहजर कामगारांवर कठोर कारवाई करणार!

## महापालिका प्रशासनाचा इशारा; रिक्त जागांवर आता कंत्राटी कामगार नेमण्याचा निर्णय

**मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी)**: कोरोनाची बाधा होत असल्याने वयोमर्यादा जास्त असलेल्या कर्मचाऱ्यांनी घरी विश्रांती घ्यावी, 'कंटेनमेंट झोन'मध्ये राहणाऱ्या कर्मचाऱ्यांनी कामावर येऊ नये, मुंबईबाहेर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना कार्यालयात येण्यासाठी वाहतूक सुविधा नाही. त्यामुळे कोरोनाबाधितांवर उपचार करण्यास मनुष्यबळ कमी पडत असल्याचे पालिका प्रशासनाने गैरहजर कामगारांवर कारवाईचा बडगा उगारण्याचा आणि रिक्त पदांवर कंत्राटी कामगार नेमण्याचा इशारा दिला आहे.

'कोविड-१९' या संसर्गजन्य आजाराची बाधा झालेल्या रुग्णांसह इतर रुग्णांना आवश्यक ते वैद्यकीय उपचार करण्यासाठी मनुष्यबळ कमी पडत आहे. या पार्श्वभूमीवर गैरहजर कर्मचाऱ्यांनी तत्काळ कामावर हजर राहा, अन्यथा बडतर्फीची कारवाई केली जाईल, असा इशारा मुंबई महापालिकेने दिला आहे. महानगरपालिकेच्या चार प्रमुख सर्वोपचार रुग्णालयांसह १६ उपनगरीय रुग्णालये, प्रसुतिगृहे, दवाखाने इत्यादींमार्फत मुंबईकरांना अव्याहतपणे वैद्यकीय सेवासुविधा देण्यात येत आहेत. तथापि, काही ठिकाणी 'वर्ग-३' व 'वर्ग-४' चे काही कर्मचारी वारंवार अनुपस्थित राहत असल्याचे निदर्शनास आले आहे. या कर्मचाऱ्यांनी देशहिताच्या दृष्टीने आणि मानवतेच्या दृष्टिकोनातून आपल्या कर्तव्यावर हजर राहण्याचे आवाहन यापूर्वीही महापालिकेद्वारे करण्यात आले आहे. या अनुषंगाने महापालिका आयुक्त इकबालसिंग चहल यांनी वारंवार अनुपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना एक शेवटची संधी दिली असून आपल्या कर्तव्यावर हजर न होणाऱ्या कर्मचाऱ्यांना अंतिम नोटीस देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानंतरही कर्तव्यावर रुजू न होणाऱ्या कर्मचाऱ्यांना बडतर्फ करुन त्यांच्या जागी तातडीने कंत्राटी स्वरूपात नवीन व्यक्तीची नियुक्ती करण्याचे निर्देशही महापालिका आयुक्तांनी दिले आहेत.

संबंधित कर्मचाऱ्यांना महापालिका प्रशासनाद्वारे यापूर्वी अनेकदा कर्तव्यावर हजर राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच महापालिकेच्या सेवा नियमावलीनुसार उपस्थित राहण्याचे आदेशदेखील वेळोवेळी देण्यात आले आहेत. मात्र, तरीही अनेक कर्मचारी अद्यापही कामावर हजर झालेले नाहीत. ही बाब लक्षात घेऊन महापालिका आयुक्तांनी गुरुवारी झालेल्या बैठकीदरम्यान या कर्मचाऱ्यांना शेवटची संधी म्हणून ७२ तासांची अंतिम नोटीस देण्याचे निर्देश दिले आहेत. ज्या कर्मचाऱ्यांचे वय ५५ वर्षे किंवा अधिक आहे आणि ज्यांना काही आजार आहे, त्यांना 'नॉन कोविड' कामे दिली जातील, असेही सदर नोटिसीत नमूद करण्यात आले आहे.

### नोटिसीनंतरही हजर न राहिल्यास कारवाई

अंतिम नोटीस देऊनदेखील जे कर्मचारी हजर होणार नाहीत, त्यांना तत्काळ बडतर्फ करण्याचे व त्यांच्या जागी कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले आहेत. तसेच मंजूर पदांपैकी जी पदे रिक्त आहेत, ती पदेदेखील कंत्राटी तत्त्वावर भरण्याचे निर्देशही दिले आहेत. यानुसार बडतर्फीमुळे रिक्त झालेल्या आणि आधीपासून रिक्त असलेल्या पदांवर कंत्राटी पद्धतीने मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यासाठी सेवापुरवठादार संस्थांची नियुक्ती करण्याचे निर्देशदेखील देण्यात आले आहेत.

# 'कोरोना योद्ध्यां'ची बदनामी करणाऱ्यांवर कारवाई करा

## म्युनिसिपल मजदूर युनियनची मागणी

**मुंबई, दि. ५ (प्रतिनिधी)**: कमी मनुष्यबळात 'कोविड' रुग्णांना चांगली सेवा देणाऱ्या 'कोरोना योद्ध्यां'चे मनोधैर्य वाढविण्याऐवजी, व्हिडिओ व्हायरल करून त्यांची बदनामी करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी म्युनिसिपल मजदूर युनियनतर्फे करण्यात आली आहे. याबाबतचे पत्र त्यांनी पालिका आयुक्त आणि महापौरांना दिले आहे.

मुंबई महानगरपालिका रुग्णालय, आरोग्य खात्यासहित अत्यावश्यक सेवेतील सर्व संवर्गातील कर्मचारी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता कोरोनाबाधित रुग्णांची सेवा करीत आहेत. मात्र, रुग्णांची सेवा करीत असतानाच प्रशासनाच्या आकडेवारीनुसार सुमारे १६०० हून अधिक कर्मचारी कोरोनाबाधित झालेले असून ४० कर्मचाऱ्यांचे निधन झाले आहे.

रिक्त पदे न भरण्याच्या प्रशासनाच्या धोरणापायी आतापर्यंत आस्थापनेवरील सर्व संवर्गातील ५६ हजारांहून अधिक पदे गेल्या काही वर्षांपासून रिक्त आहेत. एवढेच नव्हे, तर रुग्णांना चांगली सेवा देण्यासाठी एमआरआय, सिटी स्कॅन, एक्सरे, ईसीजी आदी नवनवीन मशीन आणल्या. वाढती रुग्ण संख्या विचारात घेऊन आयसीयु, ऑपरेशन थिएटर असे अधिक विभाग सुरू करण्यात आले. परंतु, याठिकाणी लागणारे मनुष्यबळ देण्यात आलेले नाही. तसेच सेवानिवृत्तीमुळे होणारी रिक्त पदेही भरली गेली नाहीत. त्यामुळे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर अधिक ताण पडत आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत चाललेला असताना, मुंबई महानगरपालिका रुग्णालय, आरोग्य खात्यासहित कामगार, कर्मचारी परिचारिका, डॉक्टर्स व इतर खात्यातील कर्मचारी कोरोनाला हरवण्यासाठी आपल्या जीवाची पर्वा न करता अत्यंत प्रामाणिकपणे काम करीत आहेत. मात्र, त्यांचे मनोबल वाढविण्याऐवजी बदनामी करून त्यांचे खच्चीकरण करण्यात येत आहे.

आपल्या अधिकाऱ्यांकडून ७० टक्के कर्मचारी कामावर हजर नाहीत म्हणून सांगितले जाते. परंतु, आस्थापनेवरील एकूण पदाच्या ४० टक्के पदे रिक्त आहेत. शिवाय ५५ वर्षांवरील, आजारी, दिव्यांग, गरोदर महिला कर्मचारी, कोरोनाबाधित कर्मचारी, क्वारंटाईन कर्मचारी, 'कंटेनमेंट झोन'मध्ये असलेले कर्मचारी हे कामावर हजर राहू शकत नाहीत. या सर्व बाबींचा विचार केला. तर ७० टक्के कर्मचारी जाणूनबुजून कामचुकारपणा करीत नसून वरील सर्व बाबींमुळे कर्मचारी अपुरे पडत आहेत. महापालिकेने वेळोवेळी पदे भरली असती आणि पूर्वीप्रमाणे रजा राखीव पदे आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या ३० टक्के ठेवली असती. तर आज या महामारीला मनुष्यबळ अपुरे पडले नसते. याचाही सारासार विचार करणे आवश्यक आहे, याचीही जाणव प्रशासनाला करून देण्यात आली आहे. रुग्णालय विभागातील सर्व संवर्गातील कर्मचारी प्राण पणाला लावून काम करत असताना त्यांची आणि महापालिकेची बदनामी करणारे व्हिडिओ व्हायरल करणारे कोण आहेत. याचा शोध घेऊन त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी शेवटी म्युनिसिपल मजदूर युनियनने केली आहे.

### PUBLIC NOTICE

My client Smt. LATHA SHYAM MENON a member of ASHWIN NAGAR "C" CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD, DIWANMAN, Vasai (West) and owner of flat bearing No. 27 on Ground floor, C-6 Wing, admeasuring to 576 Sq.ft. Carpet area in the building known as ASHWIN NAGAR "C" CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD, standing on the piece and parcel of land bearing Revenue Survey No:1, 2 and 3, Hissa No:3 and 4 (Part), Plot No: 35, laying and being situate at Village - DIWANMAN within the limits of Vasai Virar Municipal Corporation Vasai Division, Taluka - Vasai, District - Palghar. The above mentioned flat was purchased by late Ammu P. Menon and late Shyam P. Memon on 03.01.1995 jointly, Ammu P. Menon was died on 29.08.2015 and Shyam P. Menon died on 05.04.2015, as per document submitted by my client Smt. Latha S. Menon before ASHWIN NAGAR "C" CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD, the society has accepted her as a member of the said society as well as a member in respect of the said flat. My client willing to sell and/or transfer the said flat to Mr.SANTOSH R. GUPTA and Mr.MANOJ R: GUPTA and she was made an application before the ASHWIN NAGAR "C" CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD, for getting an No Objection Certificate. I hereby invite any claim or objection from heirs, other claimants and or objection for issuing No Objection to sell the said flat and transfer the said five shares in the name of Mr.SANTOSH R. GUPTA and Mr.MANOJ R. GUPTA, I therefore hereby invite claim, objection fromheirs, claimant/s within a period of fifteen days from the date of Publication of this Notice. The objection will be in written form and with supporting documents what claim she/he have and objection will take before the Chairman / Secretary of ASHWIN NAGAR "C" CO OPERATIVE HOUSING SOCIETY LTD, DIWANMAN, Vasai (West). If no claim of objection is received within the stipulated period the society shall presume that there are no claim or objection in whatsoever nature and society shall free to give/issue No Objection. If any claiming take objection after period mentioned herein above the said objection shall not be considered.

Date : 01/06/2020

(Shri.M.L.Mhatre)
Advocate
B-12, 1st Floor, Sonal Palace, Phadke Road, Dombivli (East) 421 201, Taluka - Kalyan, District-Thane

SUGO

**शेफलर इंडिया लिमिटेड** SCHAEFFLER

**रजी. ऑफिस:** नरिमन भवन, ८ वा मजला, २२७, बॅकबे रिक्लेमेशन, नरिमन पॉईंट, मुंबई – ४०० ०२१, महाराष्ट्र, इंडिया. **फोन:** +९१ २२६६८१४४४४, **फॅक्स नं.:** +९१ २२ २२०२७०२२ • **ई-मेल:** investorsupport.in@schaeffler.com **Website:** www.schaeffler.co.in • **CIN:** L29130MH1962PLC012340

**शेफलर इंडिया लिमिटेड (कंपनी) ची ५७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा**

सदस्यांनी लक्षात घ्यावे की कंपनीची ५७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) व्हिडिओ कॉन्फरन्स (व्हीसी) किंवा इतर कोणत्याही ऑडिओ व्हिज्युअल साधनांद्वारे (ओएव्हीएम) एजीएम सूचनेत ठरलेल्या व्यवसायाचा व्यवहार करण्यासाठी मंगळवार ३० जून २०२० रोजी दुपारी ३.३० आयएसटी वाजता आयोजित केली जाईल.

१. कंपनीने, ५ मे २०२०, ८ एप्रिल २०२० आणि १३ एप्रिल २०२० रोजी कॉर्पोरेट अफेयर्स मंत्रालयाने जारी केलेल्या परिपत्रकां नुसार, सेबीने जारी केलेल्या अधिसूचना आणि इतर सर्व लागू कायदे, इलेक्ट्रॉनिक मोडद्वारे ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी / डिपॉझिटरी सहभागींमध्ये नोंदणीकृत आहेत, त्यांना ५७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची बैठक घेण्याच्या सूचनांसह वार्षिक अहवाल पाठविला आहे.
२. वित्तीय वर्ष २०१९ चा एजीएम नोटीस आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाईटवर https://www.schaeffler.co.in/content.schaeffler.co.in/en/investor-relations/financials/annual-reports/index.jsp, स्टॉक एक्सचेंज वेबसाईटवर www.bseindia.com & www.nseindia.com आणि एनएसडीएल वेबसाईट www.evoting.nsdl.com वर उपलब्ध आहेत.
३. कंपनीच्या सदस्यांची नोंदणी आणि शेअर हस्तांतरण पुस्तके डिव्हिडंड आणि एजीएमच्या उद्देशाने २३ जून २०२० ते ३० जून २०२० (दोन्ही दिवस समावेश) पर्यंत बंद राहतील, अशी नोटीस कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम ९१ च्या तरतुदींच्या अनुषंगाने, देण्यात आली आहे. हे त्याअंतर्गत बनविलेले नियम व भारतीय सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया विनियम चे नियमन ४२ (लिस्टिंग ओब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट), २०१५ ('लिस्टिंग रेग्युलेशन्स') च्या नियमांसह आहे.
४. कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १०८ च्या तरतुदींचे पालन करून, कंपन्यांच्या नियम २० चे वाचन (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ च्या सुधारित आणि नियमन अधिनियम ४४ च्या नियमानुसार, नोटीसमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) द्वारे प्रदान केलेल्या ई-मतदान सेवेद्वारे सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदानाची सुविधा दिली जाते.
५. ज्या सदस्यांची नावे रेकॉर्ड तारखेला (कट-ऑफ तारखेला), अर्थात मंगळवार २३ जून २०२० रोजी, सदस्यांच्या किंवा लाभाच्या मालकांच्या नोंदीत आढळतील त्यांचे सदस्य इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करू शकतात. ई-मतदान कालावधी शनिवार, २७ जून, २०२० रोजी सकाळी ९:०० वाजता सुरू होईल आणि सोमवार, २९ जून, २०२० रोजी संध्याकाळी ०५:०० वाजता संपेल. ई-मतदान मॉड्यूल २९ जून, २०२० रोजी संध्याकाळी ५:०० वाजता अक्षम केले जाईल. व्हीसी / ओएव्हीएम सुविधेद्वारे एजीएममध्ये उपस्थित राहणारे आणि रिमोट ई-मतदानाद्वारे ठरावावर मतदानाचा हक्क बजावलेले नसतील आणि अन्यथा तसे करण्यास मनाई नसलेलेच सदस्य एजीएममध्ये ई-मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्यास पात्र असतील. ज्या सदस्यांनी रिमोट ई-वोटिंगद्वारे मतदान केले आहे ते एजीएममध्ये उपस्थित राहण्यास पात्र असतील. तथापि, ते एजीएमवर मतदान करण्यास पात्र नसतील. एजीएमपूर्वी ज्या सदस्यांनी रिमोट ई-वोटिंगद्वारे मतदान केले असेल ते वीसी किंवा ओएव्हीएम मार्फत एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात परंतु त्यांना पुन्हा मतदानाचा हक्क मिळणार नाही. भागधारकांचा मतदानाचा हक्क २३ जून, २०२० रोजीच्या कट-ऑफ तारखेनुसार कंपनीच्या पेड-अप इक्विटी समभाग भांडवलात त्यांच्या वाटा प्रमाणात असेल.
६. नोटीस पाठवल्यानंतर आणि कट ऑफ तारखेला म्हणजेच मंगळवार, २३ जून, २०२० रोजी समभाग ठेवल्यानंतर कंपनीचे समभाग ताब्यात घेतलेले आणि कंपनीचे सदस्य बनणारी कोणतीही व्यक्ती, युझर आयडी व पासवर्ड आरटीए म्हणजेच मेसर्स लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडना (ई-मेल आयडी: vadodara@linkintime.co.in. निवेदन पाठवून मिळवू शकते, तथापि, जे सदस्य आधीच एनएसडीएलकडे ई-मतदानासाठी नोंदणीकृत आहेत, त्यांचे विद्यमान यूझर आयडी आणि पासवर्ड मते देण्यासाठी वापरू शकतात.
७. काही शंका असल्यास, आपण www.evoting.nsdl.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध असलेल्या भागधारकांसाठी नेहमी विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यू) आणि भागधारकांसाठी ई-मतदान वापरकर्त्यांचे मार्गदर्शन पहा. www.evoting.nsdl.com किंवा टोल फ्री क्रमांकावर कॉल करा: १८००-२२२-९९० किंवा evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवा. ज्या सदस्यांना एजीएम पूर्वी किंवा दरम्यान मदतीची आवश्यकता असेल ते एनएसडीएलशी evotingnsdl.co.in/१८००-२२२-९९० वर संपर्क साधू शकता किंवा कु. सरिता मोटे, सहाय्यक व्यवस्थापक यांना एनएसडीएल वर saritam@nsdl.co.in/०२२-२४९९४८९० वर संपर्क साधू शकता.

**तारीख:** ५ जुन २०२०
**स्थळ:** पुणे

**शेफलर इंडिया लिमिटेड साठी**
सही
**आशिष तिवारी**
**व्हीपी-लीगल आणि कंपनी सचिव**